## रे.दि.मु. नं.२४७/२०१६ मधील नि. ३० खालील आदेश
## *CNR : MHSN06002344-2016)*
## (रामचंद्र पोतकुळे वि. सांगली-मिरज-कुपवाडशहर महानगरपालिका सांगली आणि इतर)

वादी यांनी नि.क्र.३० वर आदेश ६, नियम १७ अन्वये वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या दावा कलम १ मध्ये मिळकतीचे वर्णनासमोर १(अ) असे लिहीण्यास तसेच दावा कलम १ नंतर १(ब) असे नमुद करुन त्यामध्ये "सदर मिळकतीचे दक्षिण-पुर्व-पश्चिम ३.७० मी. लांब X १.५ मी. उंचीचे सिमेंट विटाचे वाळूमध्ये कंपाऊंड भिंतीचे बांधकामाच्या हक्कासह" असे लिहीण्यास तसेच वादी यांच्या दावा कलम १ मध्ये कलम "ब" च्या पुढे कलम १"ब" मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीच्या कंपाऊंड भिंतीचे प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी पाडापाड करु नये तसेच कोणतेही बेकायदेशीर कृत्य करु नये अशी निरंतर ताकीद प्रतिवादी यांना देण्यात यावी" असे मजकुर दुरुस्त करुन मिळावे अशी विनंती करतात. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून ती दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती दाव्यामध्ये न झाल्यास दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास अडथळा निर्माण होणार आहे. तशी दुरुस्ती झाल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट तशी दुरुस्ती न झाल्यास वादी यांच्या असणाऱ्या कायदेशीर न्याय हक्कास कायमपणे मुकावे लागणार आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज मंजुर होऊन, अर्ज कलम २ मध्ये नमुद केलेले मजकुर दावेमध्ये दुरुस्त करुन लिहीणेस परवानगी मिळावी अशी विनंती करतात.

**०२.** सदर कामी प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अर्जावरच दाखल केले आहे. ते कथन करतात की, वादी यांचा अर्ज व त्यातील कथने ही चूकीची आहेत. वादींना दावा दाखल करतेवेळी सदर गोष्टीचे ज्ञान होते. दावा दाखल करुन ४ वर्षांनी अशा स्वरुपाची दुरुस्ती मागता येणार नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. सबब सदरचा अर्ज नामंजुर करणेत

यावा अशी विनंती करतात.

**०३.** अभिलेखाची पाहणी केली असता, सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दावा हा भिंती संदर्भात असल्याचे दिसून येत आहे. परंतु वादी यांनी सदर दुरुस्ती अर्जामधील मजकुर सध्या का समाविष्ठ करीत आहेत याबाबत कोणतेही पुरेसे कारण अर्जामध्ये नमुद करीत नाहीत. सदरचा दावा हा सन २०१६ मध्ये दाखल केलयाचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी नोंदवलेल्या आक्षेपानुसार, वादी यांनी सदर दुरुस्ती अर्जात पुरेसे कारण नमुद न केल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

नि. क्र.३० वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2022.07.05 12:05:01 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.०४.०७.२०२२ चौथे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S.P.Patil. |
| Name of the Court | : | Shri. M. S. Managuli,<br>4th Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C.,<br>Miraj. |
| Date of Decision | : | 04/07/2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 05/07/2022 |
| **Order uploaded on** | **:** | **05/07/2022.** |